शासकीय कर्मचाऱ्यांस अत्युत्कृष्ट कामाबाबत
आगाऊ वेतनवाढी मंजूर करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
महसूल व वन विभाग,
परिपत्रक क्रमांक एस-१४/८२/४१४७/६९३/ई७,
मंत्रालय, मुंबई- ४०००३२,
दिनांक - ११ जानेवारी १९८३.

पहा :- शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही. १०७७/ सीआर-१२७-७९/आठ, दिनांक ४ डिसेंबर १९७९,

क्रमांक एसआरव्ही. १०७८/ सीआर- ११-७९/आठ, दिनांक ५ डिसेंबर १९७९ व क्रमांक एसआरव्ही.१०८१/१४३३/ सीआर. ११९/आठ, दिनांक २४ डिसेंबर १९८१.

परिपत्रक :-

शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, शासकीय कर्मचाऱ्यांना अत्युत्कृष्ट कामाबद्दल आगाऊ एक किंवा दोन वार्षिक वेतनवाढी मंजूर करण्याबाबत सविस्तर सूचना प्रसारित केलेल्या असताही आगाऊ वेतनवाढी देण्याच्या योजनेची कार्यवाही दक्षतापूर्वक केली जात नाही. वरील आदेशाप्रमाणे कर्मचाऱ्यांच्या कामाचे मुल्यमापन करून, एक किंवा दोन वेतनवाढी मंजूर करण्याबद्दलचे अधिकार सर्व खातेप्रमुखांना प्रदान करण्यांत आले आहेत, तरी वरील आदेशांची अंमलबजावणी योग्यवेळी करण्यात यावी अशा सूचना सर्व आयुक्त व सर्व जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात येत आहेत.

जिल्हाधिकारी रत्नागिरी
-कार्यालय-
18 JAN 1983
शाखा- EST
18/1/1983

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार
व नांवाने,
(क. नं. हुड.)
अवर सचिव,
महसूल व वन विभाग.

प्रत:-